**<u>रे.मु.नं.७५/२०११ मधील निशाणी ४९ वरील आदेश</u>**
(CNR No.MHAH08-002661-2014)

सदरचा अर्ज वादीने सशस्त्र पोलिस बंदोबस्त मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीचे म्हणणे की, निशाणी ४५ वर पोलिस मदतीचा हुकूम झालेला आहे. पोलिस जागेवर गेले असता प्रतिवादींनी ऊसाची तोड होवू दिली नाही. यास्तव प्रतिवादींवर कलम ३५३ भा. द. वि. नुसार गुन्हा दाखल झाला. वादीचे पुढे असे म्हणणे की, ऊस कारखाणा बंद होणार आहे. त्यामुळे ऊसाची तोड गरजेची आहे. तसेच वादीने पोलिस भत्त्याची रक्कम भरलेली आहे. सबब, वादीने सशस्त्र पोलिस बंदोबस्त मिळण्याची विनंती केली.

२. प्रतिवादींनी सदर अर्जास हरकत घेतली की, दावा मिळकत ही वादीने हस्तांतरीत केलेली आहे ही बाब वादीने लपविलेली आहे. तसेच वादीने न्यायालयाच्या हुकूमाचा उपयोग करुन वादीचे कुटूंबियांना मारहाण केलेली आहे. वादी ज्या ठिकाणाहून ऊस काढू पाहतो तेथे प्रतिवादीचे टोमॅटोचे व ऊसाचे पिक आहे. या पिकांचे नुकसान होणार आहे. यामुळे वादीस प्रतिवादींच्या पिकाचे नुकसान करण्यासाठी संरक्षण देण्यात येवू नये.

३. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकले. दाव्याचे अवलोकन केले. निशाणी ५ प्रमाणे प्रतिवादी यांना तात्पुरता मनाई हुकूम दिलेला आहे. तसेच निशाणी ४५ वरील आदेशाप्रमाणे ऊस तोड करणेकामी ही एक महिला व एक पुरुषाची मदत वादीस देण्यात आलेली आहे.

४. आज रोजीच्या वादीच्या अर्जानुसार प्रतिवादींनी सदर ऊसतोड होवू दिली नाही म्हणून प्रतिवादींवर ३५३ भा.द.वि. नुसार गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. निशाणी ५ व निशाणी ४५ वरील आदेशाप्रमाणे तसेच नमूद अर्जातील कथनाप्रमाणे दोन महिला व दोन पुरुष यांचा सशस्त्र बंदोबस्त मिळणेची वादींना परवानगी देणे न्यायोचित होणार आहे. सबब, खालील आदेश देण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. निशाणी ५ चे आदेशातील नमूद मिळकतीच्या नमूद क्षेत्रातील ऊस तोड करणेकामी दोन महिला व दोन पुरुष सशस्त्र पोलिस यांची मदत पोलिस निरीक्षक, घारगांव पोलिस स्टेशन, ता. संगमनेर यांनी वादीस द्यावी.

३. सदर पोलिस मदतीचा भत्ता वादीने यापूर्वी पोलिस स्टेशनला भरलेला आहे. याप्रमाणे पोलिस मदत मिळावी.

(के. पी. जैन देसरडा)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
संगमनेर.

दिनांक : २६/०४/२०१८.